जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

## प्रेसनोट क्रमांक - ६०५ दिनांक - ०७/०८/२०२३

भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन,पुणे शहर

# शस्त्राने वार करणा-या फरार आरोपीस केले अटक

दि.२२/०३/२०२३ रोजी फिर्यादी त्यांचे मित्र असे बाईक वरुन सुखसागर नगरकडे जात असतांना आरोपी आकाश रोहीत बोद्रे, कृष्णा चाबुकस्वार, कविराज सुदाम देवकाते व त्यांचे साथीदारांनी मिळुन त्यांच्याकडील गाडयावरुन ट्रिपल सिट येऊन फिर्यादी यांना शिवीगाळ करुन गाडीवरुन उतरुन त्यांच्या हातातील धारदार शस्त्राने जीवे ठार मारण्याच्या उददेशाने फिर्यादी व त्याचा मित्र याच्यावर लोंखडी हत्याराने वार करुन गंभीररित्या जखमी केले व त्याठिकाणी लोकांमध्ये दहशत पसरवून पळून गेले आहे म्हणुन भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि नंबर १८९/२०२३,भा.द.वि.क.३०७,१४३,१४७,१४८ १४९,३२३,५०४,५०६,क्रिमीनल अमेंटमेंन्ट अॅक्ट कलम ७, महाराष्ट्र पोलीस अॅक्ट कलम ३७(१)(३), आर्म अॅक्ट कलम ४(२५) अन्वये गुन्हा दाखल आहे.

दाखल गुन्हयातील पाहीजे आरोपीतांचा शोध घेत असताना पोलीस अंमलदार **मितेश चोरमोले, अभिजीत चौधरी अशिष गायकवाड, अवधुत जमदाडे** यांना नमुद गुन्हयातील पाहीजे आरोपी **प्रेम भगवान यादव, वय २२ वर्षे, रा. उरळी कांचन, पुणे** हा गोकुळनगर, कात्रज कोंढवा रोड येथील भागात फिरत आहे. अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनचे तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी कात्रज कोंढवा रोडवरील, गोकुळनगर, भागात जावुन आरोपीचा शोध घेतला असता तो मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन नमुद गुन्हयामध्ये दिनांक ०५/०८/२०२३ रोजी अटक केली आहे.

सदरची कारवाई मा.अपर पोलीस आयुकत, पश्चिम प्रादेशीक विभाग, पुणे शहर श्री.प्रविणकुमार पाटील, मा. पोलीस उप आयुक्त परिमंडळ-२ श्रीमती स्मार्तना पाटील, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग, पुणे श्री.नारायण शिरगावकर यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशनकडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.विजय कुंभार, तसेच पोलीस निरीक्षक (गुन्हे) विजय पुराणिक, गिरीशकुमार दिघावकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल रसाळ, पोलीस उप निरीक्षक धिरज गुप्ता,पोलीस अंमलदार मितेश चोरमोले अभिनय चौधरी, अशिष गायकवाड, अभिजीत जाधव, अवधुत जमदाडे, सचिन सरपाले, शैलेश साठे, निलेश ढमढेरे, चेतन गोरे, मंगेश पवार, हर्षल शिंदे, निलेश खैरमोडे, धनाजी धोत्रे, सचिन गाडे, विक्रम सावंत, राहुल तांबे,यांच्या पथकाने केली आहे.